## संविधान म्हणजे काय?

मला सांगा, तुम्ही आपल्या शाळेत कधीही येता का? नाही ना?
कोणताही शिक्षक कधीही येऊन शिकवायला लागतो का? नाही.
तुम्ही कोणतेही कपडे घालून शाळेत येता का? नाही.
परीक्षेला बसलात किंवा नाही बसलात तरी चालेल—असं होतं का?... नाही?... मग?

म्हणजे, आपल्या शाळेची वेळ ठरलेली असते. शिक्षकांची वेळही ठरलेली असते. कोणते-कोणते विषय शिकवायचे, हेही ठरलेलं असतं. तुझ्यासाठी शाळेचा गणवेश ठरलेला असतो. परीक्षेची वेळही ठरलेली असते. हो ना?

हे सगळं काय आहे?—नियम आहेत.
म्हणजे शाळा नीट चालवण्यासाठी आपण काय बनवतो? नियम बनवतो.
एखादी शाळा चालवायची असेल तर तिचे काही नियम असतात, काही गोष्टी/विचार असतात.

तर एवढा मोठा देश चालवण्यासाठी नियम आणि विचार लागतात की नाही? लागतात ना?
हे नियम आणि विचार ज्या पुस्तकात लिहिलेले आहेत, तेच पुस्तक म्हणजे **भारताचे संविधान**.

आपण ज्या देशात जन्मलो, ज्या देशाचे खातो, ज्या देशात शिकतो, ज्या देशात वाढतो, ज्या देशात कमावतो—तो देश ज्या पुस्तकानुसार चालतो, तेच पुस्तक म्हणजे संविधान.

“26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान लिहून पूर्ण झाले आणि संविधान सभेने त्याला मंजुरी दिली; म्हणून हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो.”

तुम्हाला माहिती आहे का, देशात संविधान कधीपासून लागू झाले?
26 जानेवारी 1950 पासून संविधानानुसार देशाचे कामकाज सुरू झाले.